मनु/एस सी / ०७८७/१९९७/

**समतुल्य उद्धरण :** १९९७ (२१) ए सी आर ८४२(एस सी ), ए आय आर १९९७ एस सी ३०१७, १९९७ (२)ए एल डी (फौजदारी )४४६, १९९७ (३५)ए सी सी ४३७, १९९७ ((२)) ए एल टी (फौजदारी )६३०, १९९७(२)ए एल टी (फौजदारी )६३०, १९९७(५) ए एल टी ११(एस सी), १९९७ (२)बी एल जे आर १५९६, III (१९९७) सी सी आर ८८ ( एस सी ), १९९७ फौजदारी एल जे ३५२५, १९९७ (३) गुन्हा १४७(एस सी ), जे टी १९९७(७)एस सी २८४, १९९७-२-एल डब्लू ( फौजदारी)७१९, १९९८ (II)ओ एल आर (एस सी)५८४, १९९७(२)पी एल जे आर ११६, १९९७ (५)एस सी ए एल ई ३७७, (१९९८)९एस सी सी ४३७, [१९९७)एस यू पी पी ३एस सी आर २१९

भारताच्या सर्वोच्च न्यायालयात

रिट याचिका (फौजदारी ) क्रमांक ५३९/१९८६ सह रिट याचिका (फौजदारी )क्रमांक ५९२/१९९७ मधील फौजदारी किरकोळ याचिका क्रमांक ४२०१ / १९९७.

निर्णय दिल्याची तारीख :- ०१. ०८. १९९७

याचिकाकर्ता :- दिलीप क. बसू आणि अशोक क .जोहरी

विरुद्ध

उत्तरवादी :- पश्चिम बंगाल राज्य आणि इतर

माननीय न्यायमूर्ती /न्यायमंच:
माननीय न्यायमूर्ती डॉ.ए.एस.आनंद आणि माननीय न्यायमूर्ती के.टी. थॉमस,

अधिवक्ता :-
माननीय कोर्टासमोर उपस्थित होणाऱ्या पक्षांसाठी:- अभिषेक मनु सिंघवी, अतिरिक्त सॉलिसिटर जनरल (ए . सी. )आणि सुरुची अग्रवाल, सुशील कुमार जैन, वाय.पी. धमीजा आणि बी. कृष्णा प्रसाद, अधिवक्ता

**आदेश**

१. डी.क. बसू विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य एम .ए .न. यू. /एस. सी. /०१५७/१९९७: १९९७ फौजदारी आय एल. जे. ७४३, या प्रकरणामध्ये १८ डिसेंबर १९९६ रोजी , उक्त न्यायालयाने कोठडीतील हिंसाचार रोखण्यासाठी एक उपाय म्हणून कायदेशीर तरतुदी केल्या

जाईपर्यंत अटक किंवा स्थानबद्धतेच्या सर्व प्रकरणांमध्ये पाळावयाच्या काही मूलभूत "आवश्यकता " ठरविल्या आहेत , त्या खालीलप्रमाणे ( परिच्छेद ३६):

१. अटक आणि अटक केलेल्या व्यक्तीची चौकशी करणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या पदनामासह अचूक ,दृश्यमान , स्पष्ट ओळख दिसणारी नावाची पाटी लावली पाहिजे. अटक केलेल्या व्यक्तीची चौकशी करणाऱ्या अश्या सर्व पोलिस कर्मचाऱ्यांचे तपशील नोंदवही मध्ये नोंदविणे आवश्यक आहे.

2.पोलीस अधिकाऱ्याने अटक करणाऱ्या व्यक्तीला अटक करते वेळी अटकेचा मेमो तयार करावा आणि सदर मेमो किमान एका साक्षीदाराद्वारे साक्षांकित केला गेला पाहिजे, जो अटक केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील सदस्य किंवा ज्या परिसरातून अटक करण्यात आली आहे त्या परिसरातील सन्माननीय व्यक्ती असू शकतो. त्यावर अटक केलेल्या व्यक्तीची प्रतिस्वाक्षरी देखील असेल आणि त्यात अटकेची वेळ आणि तारीख असेल.

३. ज्या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे किंवा स्थानबद्ध करण्यात आले आहे आणि पोलीस स्टेशन किंवा चौकशी केंद्र किंवा इतर अटक कोठडीत ठेवण्यात आले आहे , ती व्यक्ती , त्याच्या एका मित्राला किंवा नातेवाईकाला किंवा त्याच्या हितचिंतक असलेल्या व्यक्तीला शक्य तितक्या लवकर त्याला अटक करण्यात आली आहे आणि विशिष्ट ठिकाणी स्थानबद्ध केले जात आहे हे कळविण्याचा हक्क त्याला असेल ,जेव्हा अटकेच्या मेमो साक्षांकित करणारा साक्षीदार अटक केलेल्या व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक नसेल.

४. अटक केलेल्या व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक जिल्ह्याबाहेर किंवा शहराबाहेर राहत असल्यास त्याच्या अटकेची वेळ , ठिकाण आणि ताब्यात घेण्याचे ठिकाण , पोलिसांनी जिल्ह्यातील विधी सहायक संघटना आणि संबंधित क्षेत्राच्या पोलीस स्टेशन यांच्या मार्फत त्यास अटक केल्यानंतर ८ ते १२ तासाच्या आत 'तार ' ( Telegraphically ) द्वारे सूचित केले पाहिजे.

५. अटक केलेल्या व्यक्तीला अटक झाल्यानंतर किंवा स्थानबद्ध केल्यानंतर लगेचच एखाद्या व्यक्तीला त्याच्या अटकेची किंवा स्थानबद्ध झाल्याची माहिती देण्याचा अधिकाराची जाणीव करून दिली पाहिजे.

६. अटक झालेल्या व्यक्तीच्या अटकेबाबत स्थानबद्धतेच्या ठिकाणी असलेल्या डायरी मध्ये नोंद करणे आवश्यक आहे ज्यामध्ये अटक झाल्याची माहिती देण्यात आलेल्या व्यक्तीच्या मित्राचे नाव आणि अटक केलेला व्यक्ती ज्याच्या ताब्यात आहे त्या पोलिस अधिकाऱ्यांची नावे आणि तपशील देखील उघड केले जातील.

७. अटक केलेल्या व्यक्तीने ,त्याने विनंती केल्यास , त्याच्या अटकेच्या वेळी त्याची तपासणी केली पाहिजे आणि त्याच्या / तिच्या शरीरावर काही गंभीर किंवा किरकोळ जखमा असल्यास त्याची त्याच वेळी नोंद करणे आवश्यक आहे. "तपासणी मेमो " वर अटक करण्यात आलेल्या व्यक्तीची आणि अटक करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्याची दोघांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे आणि त्याची प्रत अटक करण्यात आलेल्या व्यक्तीला देण्यात यावी .

८. अटक केलेल्या व्यक्तीची स्थानबद्ध कोठडीत असतांना दर ४८ तासांनी संबंधित राज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाच्या आरोग्य सेवा संचालकांनी नियुक्त केलेल्या मान्यता प्राप्त डॉक्टरांच्या पॅनेलवरील प्रशिक्षित डॉक्टरांकडून वैधकीय तपासणी केली पाहिजे. आरोग्य सेवा संचालकांनी सर्व तालुके आणि जिल्हयांसाठी अशी समिती तयार करावी.

९. वर उल्लेखित केलेल्या अटकेचा मेमोसह सर्व कागदपत्रांच्या प्रती,इलाका दंडाधिकारीकडे त्यांच्या नोंदीसाठी पाठविल्या पाहिजेत .

१०. अटक केलेल्या व्यक्तीला चौकशीदरम्यान त्याच्या वकिलाला भेटण्याची परवानगी दिली जाऊ शकते. परंतु संपूर्ण चौकशी दरम्यान अशी परवानगी दिली जाऊ शकत नाही.

११. सर्व ज़िल्हा आणि राज्य मुख्यालयांमध्ये एक पोलिस नियंत्रण कक्ष उपलब्ध करून देण्यात यावा, ज्यामध्ये अटक करणाऱ्या अधिकाऱ्यांनी अटक आणि अटक केलेल्या व्यक्तीच्या कोठडीची माहिती , अटक केल्याच्या १२ तासाच्या आत कळवावी आणि पोलीस नियंत्रण कक्षात ती दर्शनी सूचना फलकावर प्रदर्शित करावी .

२. या न्यायालयाने असेही मत व्यक्त केले आहे कि, वरील आवश्यकतांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास ,संबंधित अधिकाऱ्याला विभागीय कार्यवाही व्यतिरिक्त न्यायालयाचा अवमान करण्याबद्दल शिक्षा होऊ शकते आणि न्यायालयाचा अवमान केल्याबद्दलची कार्यवाही देशाच्या कोणत्याही उच्च न्यायालयात , ज्याचे या प्रकरणावर प्रादेशिक अधिकार क्षेत्र आहे सुरु केली जाऊ शकते. या न्यायालयाने पुढे ए. आय. आर. १९९७ एस. सी. डब्ल्यू. २३३ चे विचार व्यक्त केले.

वर नमूद केलेल्या गरजा प्रत्येक राज्य / केंद्रशासित प्रदेशाचे पोलीस महासंचालक आणि गृहसचिव यांच्या कडे पाठविल्या जातील आणि त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये त्या प्रसारित करणे आणि प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये दर्शनी ठिकाणी त्या अधिसूचित करणे हे त्यांना बंधनकारक असेल. दूरदर्शनच्या राष्ट्रीय वाहिनीवर (नेटवर्कवर) दाखविण्यवतिरिक्त ऑल इंडिया रेडिओ वरील गरजांचे प्रसारण करणे देखील उपयुक्त आणि मोठ्या हिताचे ठरेल. सामान्य लोकांच्या माहितीसाठी त्यांच्या स्थानिक भाषेत या 'गरजा' असलेल्या पत्रिकांचे प्रकाशन आणि वितरण करणे देखील उपयुक्त ठरेल. अटक केलेल्या व्यक्तीच्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणे हे आमच्या मते कोठडीतील गुन्ह्याच्या दुष्टपणाचा सामना करण्यासाठी आणि पारदर्शकता आणि जवाबदारी आणण्यासाठी योग्य दिशेने टाकलेले एक पाऊल ठरेल . अशी आशा आहे कि या ' गरजांमुळे' चौकशी आणि तपासादरम्यान आक्षेपार्ह पद्धतीचा वापरावर जे कोठडीतील गुन्हे वाढीस कारणीभूत ठरतात , जरी पूर्णपणे नाही तरी, आळा बसेल .

३. निर्देश जारी करून सात महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. या याचिकांच्या द्वारे, न्यायालयाला मुख्य याचिकेत मदत करणारे डॉ. सिंघवी विद्वान न्यायमित्र यांनी वरील

निर्देशांचे पालन आणि आवश्यकतांच्या प्रसारणासाठी ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनच्या राष्ट्रीय प्रसारणने (नेटवर्कने )उचलेल्या पावलांचा अहवाल या न्यायालयाला देण्यासाठी पोलीस महासंचालक आणि प्रत्येक राज्यातील /केंद्रशासित प्रदेशाच्या ग्रुहसचिव यांना निर्देश देण्याची मागणी केली आहे.

४. अटक केलेल्यांशी संबंधित वरील निर्देशांचे पालन करण्याबाबत संबंधित राज्य /केंद्रशासित प्रदेशाचे पोलीस महासंचालक आणि गृहसचिव यांच्याकडून अहवाल /अहवाल या न्यायालयाला पाठविण्यासाठी, या आदेशाच्या प्रतीसह या अर्जाची प्रत १ ते ३१ उत्तरवादींना पाठविण्याचे निर्देश आम्ही नोंदणी शाखेला देतो . कोणत्या गरजा कोणत्या पद्धतीने पूर्ण केल्या गेल्या आहेत , तसेच कोणत्या गरजा अजूनही पूर्ण करायच्या राहिल्या आहेत आणि त्या पूर्ण करण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत हे दर्शविणारा अहवाल तक्त्याच्या स्वरूपात असायला पाहिजे.

५. ऑल इंडिया रेडिओ आणि दूरदर्शनच्या संचालकांकडूनहि केलेल्या प्रसारणासंदभार्त अहवाल प्राप्त केला जाईल.

६. या व्यतिरिक्त, १ ते ३१ उत्तरवादींना सर्वोच्च न्यायालयातील संबंधित राज्ये/केंद्रशासित प्रदेशांच्या स्थायी वकिलामार्फत नोटीस दिली जाऊ शकते. अहवाल प्राप्त झाल्यानंतर , त्याच्या प्रति अभिलेखावरील अधिवक्तांना डॉ . सिंघवी , श्रीमती सुरुची अग्रवाल, यांना सादर केल्या' जातील .

७. आजपासून सहा आठवड्यांच्या आत , हा अहवाल वर दर्शविलेल्या अटींप्रमाणे न्यायालयासमोर सादर करण्यात येईल . सात आठवड्या नंतर हे प्रकरण निरिक्षण करण्यासाठी बोर्डावर ठेवले जाईल.

**<u>अस्वीकरण</u>**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".